**गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र.पशियो-२०२५/प्र.क्र.७०/ई-१०८८८४५/तांशि-४**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: १५ एप्रिल, २०२६.

**वाचा** :- १) समक्रमांकित शासन निर्णय, दि.१६.०२.२०२६

२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.जा.क्र.तंशिसं/१८पर.शिष्य./बी-२१/२०२६/२०६, दि.१०.०४.२०२६

**प्रस्तावना :-**

खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" या योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता संदर्भाधिन शासन निर्णयानुसार पी.जी. अभ्यासक्रमाच्या २३ व पीएच.डी अभ्यासक्रमाच्या ०१ अशा २४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. त्यामधील काही विद्यार्थ्यांनी आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने परदेशी शिष्यवृत्ती मंजूर झाल्याशिवाय परदेशी शिक्षणासाठी जाता न आल्याने, अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे. त्यानुषंगाने संदर्भाधिन शासन निर्णयातील निवड झालेल्या व शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेश न घेऊ शकलेल्या काही विद्यार्थ्यांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

परदेशातील उच्च शिक्षणासाठी खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजनेंतर्गत सन २०२५-२६ करीता पीएच.डी अभ्यासक्रमाच्या एकूण १ व पी.जी. अभ्यासक्रमाच्या एकूण २३ अशा एकूण २४ उमेदवारांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यातील ०५ विद्यार्थ्यांना आर्थिक स्थिती कमकुवत असल्याने परदेशी शिष्यवृत्ती मंजूर झाल्याशिवाय परदेशी शिक्षणासाठी जाता न आल्याचे पडताळणी दरम्यान निदर्शनास आले आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांनी ज्या अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला होता त्याच अभ्यासक्रमांमध्ये त्याच विद्यापीठामध्ये मुदतवाढीने प्रवेश मिळाल्याचे कळविले आहे.

२. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या खाली नमूद ०५ विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम प्रवेशासाठी तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | मुदतवाढीप्रमाणे अभ्यासक्रम सुरु होण्याचा कालावधी | विद्यार्थ्याचा अभ्यासक्रम | विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. आर्यन सुरेंद्र अग्रवाल | जुलै, २०२६ | Ph. D. in Material Chemistry | The University of Manchester, Australia |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | कु. ह्रदी विजय भंडारी | जुलै, २०२६ | Masters of Business Information Systems (P.G.) | The Australian National University |
| ३ | श्री. सत्यम सिध्देश्वर जोशी | सप्टेंबर, २०२६ | Digital Media Innovation M.A. (P.G.) | University of Bristol |
| ४ | कु. किरण किशोर तत्तू | जुलै, २०२६ | Masters in Biology (P.G.) | Arizona State University, United States |
| ५ | श्री. सिध्देश सतिश दिवे | जुलै, २०२६ | Masters of Applied Finance (P.G.) | The University of Western Australia |

३. उपरोक्त नमूद विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभाकरीता संदर्भाधिन शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. सदरचा खर्च हा वित्तीय वर्ष सन २०२६-२७ पासून खालील लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध असलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्र.डब्ल्यू-३, २२०३ तंत्रशिक्षण-१०७ शिष्यवृत्त्या (००)(०१) गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे (२२०३ ३५५१) (कार्यक्रम)"

वरील खर्चासाठी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी असलेले लेखाधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन अदा करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६०४१५१५२६१२९३०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL RAMCHANDRA CHAURE

Digitally signed by ANIL RAMCHANDRA CHAURE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HTED, 2.5.4.20=6702D541C3481612BAD5DC130EEB99A9B97C00C39D6C82D68BCB086B1FA08698, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=442E1293BBCF028938E3D674F26AB93E80F0C579F8D94DD6EF3DB6A124829D69, cn=ANIL RAMCHANDRA CHAURE
Date: 2026.04.15 15:27:03 +05'30'

**( अनिल चौरे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक कल्याण आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
७) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई

९) सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१२) आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास/ आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१५) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७) संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१८) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९) कुलसचिव, सर्व कृषी / अकृषी विद्यापीठे
२०) कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.माणगांव, जि.रायगड
२१) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
२२) सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
२४) महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२५) महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
२६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२७) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२८) उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२९) कक्ष अधिकारी / अवर सचिव (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३०) अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
३१) निवडनस्ती/तांशि-४.